# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** सातारा शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0897 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**29/10/2025 02:58

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 28/10/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 28/10/2025
**Time From (वेळेपासून):** 15:51 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:51 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/10/2025 **Time (वेळ):** 02:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 007
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/10/2025 02:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** शिक्षण अधिकारी ,माध्यमिक शिक्ष,विभाग जिल्हा परिषद सातारा कार्

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** प्रविण नारायण निंबाळकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे,सातारा शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे,सातारा शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9552574140

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | वैशाली शंकर माने | | | 1. माध्यमिक शिक्षण विभाग ,जिल्हा परिषद सातारा,सातारा शहर, सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब दि. 29.10.2025

मी. श्री. प्रविण नारायण निंबाळकर,वय-39 वर्षे व्यवसाय नोकरी,पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे मो.नं.9552574140.

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि. 26.10.2025 रोजी प्रशासन अधिकारी श्री.दयानंद गावडे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी आम्हास फोन वरुन कळविले की, तक्रारदार यांची लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून आपण सदर तक्रारदार यांना संपर्क करुन त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करा असे आम्हास आदेशित करुन पुढील कारवाईसाठी तक्रारदार यांचा संपर्क क्रमांक दिला.त्याप्रमाणे आम्ही तक्रारदार यांचे मोबाईल फोनवर संपर्क केला असता तक्रारदार यांनी त्यांचे नाव संजय बापुराव पुजारी असल्याचे सांगुन दि.27/10/2025 रोजी सकाळी नवले ब्रिज,पुणे येथे तुम्हाला भेटतो त्यावेळी माझी तक्रार सांगतो असे सांगितले.तसेच मपोहवा/7901 गोरे व मपोशि माकर, पोशि/9543 महामुलकर व शासकिय वाहन एम.एच.12 यु सी 4109 व चालक पोहवा दिवेकर हे मदत कामी दिले असल्याचे सांगुन प्रशासन अधिकारी पोलीस उपअधीक्षक श्री.दयानंद गावडे,यांनी पंचायत समिती,हवेली येथील राखीव असलेले पंच श्री.धनेश शिवचंद्र शमनेवाडीकर पशुधन पर्यवेक्षक,पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती हवेली पुणे श्री. दयासागर शंकर शेंडगे कनिष्ठ सहायक पंचायत समिती. हवेली यांचे संपर्क क्रमांक दिले त्यानंतर आम्ही दोन्ही पंचाना संपर्क करुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे येथे आमचे कक्षात दि.27/10/2025 रोजी 07.30 वाजता हजर राहणेबाबत कळविले त्यानुसार दि.27.10.2025 रोजी नमुद दोन्ही पंच आमचे कक्षात हजर झाले.त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना सापळा पथकाची ओळख करुन दिली तसेच तक्रारदार श्री.पुजारी हे नवले ब्रिज,पुणे येथे थांबलेले असुन त्यांनी तेथे बोलावले असल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही वर नमुद शासकिय वाहनामधुन पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे साहित्य घेऊन लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय,पुणे येथुन बाहेर पडुन नवले ब्रिज येथे पोहोचलो सदर ठिकाणी तक्रारदार थांबले होते आम्ही तक्रारदार यांना शासकिय वाहनात घेतले सदर वेळी तक्रारदार श्री.संजय बापुराव पुजारी व नमुद दोन्ही पंच यांची एकमेकांची ओळख करुन दिली तसेच सापळा पथकातील अधिकारी अंमलदार यांची ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही पंच साक्षीदार यांना तक्रारदार श्री.संजय बापुराव पुजारी यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्यांची तक्रार नोंदवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणे आहे त्याकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का?अशी विचारणा करता त्यास नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला. त्याप्रमाणे पंच क्र.1 म्हणून श्री. धनेश शिवचंद्र शमनेवाडीकर पंच क्र.2 म्हणून श्री. दयासागर शंकर शेंडगे हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले.सदर वेळी तक्रारदार यांनी त्यांची तक्रार प्रथम तोंडी कथन केली व नंतर लेखी स्वरुपात दिली ती पुढीलप्रमाणे.

तक्रारदार श्री.संजय बापुराव पुजारी,वय- 62 वर्षे ,धंदा -सेवानिवृत्त रा.कृष्णा कोयना सोसायटी प्लॉट नं.3ए सौभाग्य मंगल कार्यालयाजवळ,गोलेश्वर रोड कार्वे नाका कराड जि.सातारा. मो.नं.9226163260.

" मी वरील पत्त्यावर मुक्कामी राहतो. मी शिक्षण मंडळ कराडच्या संस्थेतील आत्माराम विदयामंदीर ओगलेवाडी ता.कराड जि.सातारा. येथुन दि.28/02/2022 रोजी सेवानिवृत्त झालो आहे.माझा 24 वर्षाचा सेवा कालावधी पुर्ण असलेला निवड श्रेणी प्रस्ताव माझ्या वरील नमुद शाळेने मा.शिक्षण अधिकारी सो.माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परीषद,सातारा यांचेकडे दाखल केला आहे.माझ्या सदर प्रस्तावाच्या मंजुरी आदेशाच्या मागणी संदर्भात मा. शिक्षण अधिकारी श्री.चोपडे साहेब यांना मी दि.16/10/2025 रोजी भेटलो तेव्हा त्यांनी क्लर्क श्रीमती माने मॅडम यांना भेटण्यास सांगितले.त्यानंतर मी माने मॅडम यांची भेट घेतली असता त्यांनी तुमचे निवड श्रेणीचे आदेशाचे काम पुर्ण करण्यासाठी साहेबांना 25000/- रुपये दयावे लागतील असे सांगुन माझेकडे 25000/- रुपयाची मागणी

केली. श्रीमती माने मॅडम यांनी मागणी केलेली रक्कम ही लाच रक्कम असुन ती देण्याची माझी इच्छा नाही.त्यांचेत व माझेत कोणताही आर्थिक व्यवहार नाही.तरी आपले विभागामार्फत कारवाई व्हावी ही नम्र विनंती" वगैरे मजकुराची तक्रार तक्रारदार यांनी स्वहस्ताक्षरात लिहून दिली नंतर सदरची तक्रार आम्ही व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.पुजारी यांना नमूद लोकसेवक क्लर्क माने मॅडम यांनी कधी व कुठे भेटण्यास बोलाविले आहे अशी विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले की, क्लार्क माने मॅडम या माध्यमिक शिक्षण विभाग , जिल्हा परिषद ,सातारा येथे बसतात तेथे जाऊन मी त्यांची भेट घेणार आहे तरी आपण पुढील कारवाई सातारा येथे जाऊन करु त्यानंतर आम्ही चालक पोहवा दिवेकर यांना शासकिय वाहन सातारा येथे घेणेस सांगितले नुसार शासकिय वाहन नवले ब्रिज येथुन निघुन मुंबई बँगलोर हाय वे ने सातारा येथे श्री.उत्तर चिदंबरम नटराज मंदीर सातारा येथे पोहोचलो ती वेळ 11.00 वा ची होती.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.पुजारी यांचेकडे क्लर्क माने मॅडम या लाच मागणी करतात अगर कसे? याबाबतची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले.पडताळणीसाठी पंच क्र.1 श्री.धनेश शिवचंद्र शमनेवाडीकर व पंच क्र.2 म्हणून श्री.दयासागर शंकर शेंडगे हे काम पाहतील असे ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 व क्र.02 यांचे निवेदन घेण्याचे ठरले

त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये सॅनडीस्क कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड त्यांचे वेस्टनातुन बाहेर काढले ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले.व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्याबाबत माहिती दिली तसेच त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली.त्यानंतर तक्रारदार पुजारी व पंच पंच क्र.1 शमनेवाडीकर पंच क्र.02 शेंडगे यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 11.18 वा ची होती.त्यानंतर तक्रारदार श्री.पुजारी यांना क्लर्क माने मॅडम , माध्यमिक शिक्षण विभाग,सातारा जिल्हा परिषद यांचेकडे लाच मागणी पडताळणी कामी पाठवण्याचे ठरले.त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार, तक्रारदार व सापळा पथकास पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून तो तक्रारदार श्री.पुजारी यांनी परिधान केलेल्या शर्टचे आतील बाजुस सेफटी पिन च्या सहाय्याने लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01 श्री. शमनेवाडीकर यांचेसह पडताळणीकामी तक्रारदार यांना श्री.उत्तर चिदंबरम नटराज मंदीर सातारा येथुन रिक्षा मधुन माध्यमिक शिक्षण विभाग,जिल्हा परिषद सातारा येथे रवाना केले ती वेळ 11.48 वा ची होती.

त्यानंतर आम्ही सापळा पथक पंच क्र.02 असे श्री.उत्तर चिदंबरम नटराज मंदीर सातारा येथे थांबुन राहिलो.त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.त्यावेळी पोशि महामुलकर यांनी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 13.52 वा.ची होती.त्यानंतर आम्ही पंच क्र.01 शमनेवाडीकर यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की,मी व तक्रारदार असे शिक्षणाधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परीषद सातारा येथे गेलो असता सदर ठिकाणी क्लर्क माने मॅडम या उपस्थित होत्या.त्यावेळी मी व तक्रारदार असे त्यांचे कार्यालयात गेलो.त्यावेळी माने मॅडम व तक्रारदार यांचेत कामासंदर्भात चर्चा झाली सदर चर्चे दरम्यान तक्रारदार हे क्लर्क माने मॅडम यांना बोलले की, “परवा तुम्ही सांगितले की, साहेबांना दयायला पाहीजे,साहेबांना दयायचे की तुम्हालाही दयायचे? त्यावर क्लर्क मॅडम या,” आत आहेत की साहेब जा तुम्ही भेटा की, साहेबांना” असे म्हणाल्या त्यावर तक्रारदार यांनी “बर ते मॅडम पंचवीस, पंचवीस हजारच का?”एवढेच दयायचे का?” त्या दिवशी बोलला ,मग काय कमी होणार नाहीत का? असे विचारले असता त्यावर माने मॅडम म्हणाल्या बघु संध्याकाळ पर्यंत थांबा जरा,मग बघु असे म्हणाल्या. त्यानंतर तक्रारदार यांनी पंचवीस हजारच दयावे लागतील का? असे विचारले असता क्लर्क माने मॅडम यांनी,” हां तुम्ही जे काही सांगितल असेल ते. तस मी नाय सांगु शकत असे म्हणाल्या.त्यानंतर तक्रारदार यांनी साहेबांनी ,सांगीतलय ?” असे विचारले असता ,”"मोठ्याने बोलु नका कॅमेरे चालु असतात असे माने मॅडम म्हणाल्या.त्यावर तक्रारदार हे माने मॅडम यांना साहेबांकडे जाऊ का?असे विचारले असता “थांबा जरा येऊ देत की बसा” माने मॅडम यांनी असे बोलुन तक्रारदार व मला बाजुला बसणेस सांगितले.त्यांनतर आम्ही थोडा वेळ साहेबांची वाट पाहत थांबलो. त्यानंतर तक्रारदार यांनी क्लार्क माने मॅडम यांना विचारले की,किती वाजता येतील साहेब त्यावर माने मॅडम म्हणाल्या साहेब मिटींग झाल्यावर येतील अंदाजे दुपारनंतर जेवण करून येतील , तुम्ही या जेवण करुन असे सांगितले.त्यानंतर तक्रारदार हे माने मॅडम यांना आम्ही पण जेवण करुन येतो असे बोलले व त्यानंतर आम्ही आपण थांबलेल्या ठिकाणी परत आले◌ा.असे सांगितले.त्यानंतर तक्रारदार श्री.पुजारी यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता तक्रारदार श्री.पुजारी यांनी पंच क्र.01 शेमनेवाडीकर यांचेप्रमाणे हकिकत सांगितली.त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी

सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली. सदर वेळी आम्ही तक्रारदार पुजारी यांना लोकसेवक माने मॅडम या त्यांचेकडे मागणी करत असलेली लाच रक्कम कोणाकरीता मागणी करतात असे विचारले असता तक्रारदार यांनी क्लर्क माने मॅडम सदर लाच रक्कम चोपडे साहेबांकरीता मागणी करत असल्याचे सांगितले.आम्ही तक्रारदार यांना माने यांचे वरीष्ठांची भेट घेऊन त्यांचेकडे पडताळणी का केली नाही असे विचारले असता त्यांनी ते बाहेर गेले असल्याने भेट झाली नाही असे सांगितले.त्यावेळी आम्ही तक्रारदार पुजारी यांना क्लर्क माने मॅडम यंाचेकडे व चोपडे साहेब यांचेकडे परत पडताळणी कामी जाणे आवश्यक असल्याचे सांगितले व सदर पडताळणी वेळी तक्रारदार यांनी माने मॅडम यांचेशी बोलणी करुन लाच रक्कम निश्चीत करुन माने मॅडम साहेबांसाठी लाच मागत असलेल्या चोपडे साहेब यांची भेट घेऊन त्यांचेशी कामा संदर्भात त्यांचेकडे चर्चा करुन पडताळणीकामी जाणेबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी पडताळणीकामी जाणेस होकार दिला.त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार,तक्रारदार व सापळा पथकास पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून तो पोशि/9543 महामुलकर यांनी तक्रारदार श्री.पुजारी यांनी परिधान केलेल्या शर्टचे आतील बाजुस सेफटी पिन च्या सहाय्याने चालु करुन लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01 श्री. शमनेवाडीकर यांचेसह चोपडे साहेब व माने मॅडम यांचेकडे पडताळणीकामी ,माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परीषद सातारा येथे रिक्षामधुन श्री.उत्तर चिदंबरम नटराज मंदीर सातारा,येथुन रवाना केले ती वेळ 15.14 वा ची होती.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.त्यावेळी पोशिमहामुलकर यांनी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 17.37 वा.ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र.01 शमनेवाडीकर यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की,मी व तक्रारदार असे शिक्षणाधिकारी ,माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परीषद सातारा येथे गेलो तेथे क्लर्क माने मॅडम होत्या त्यावेळी तक्रारदार यांनी माने मॅडम यांना साहेब कधी येतील असे विचारणा करता माने मॅडम या बोलल्या व्हिजीटर्स संपु दे बघु असे बोलल्या त्यावर तक्रारदार हे त्यांना मिटींग संपल्यावर जायच का ?असे विचारले असता त्यावर "मी पण असेनच तुम्ही एवढ करा तेवढ करा असे काही बोलु नका, तुम्ही समजुन घ्या" असे माने मॅडम म्हणाल्या. त्यानंतर तक्रारदार माने मॅडम यांना थोडीच माणसयत असे बोलले असता त्यावर माने मॅडम या हां थोडीचयत ती गेली ना तुमची फाईल आत मध्येच साईडलाचय टेबलवर असे बोलल्या त्यावर तक्रारदार मी बसु का? असे म्हणुन तक्रारदार व मी बाजुला जाऊन बसलो.त्यानंतर थोडया वेळान मी व तक्रारदार पुजारी असे चोपडे साहेब यांचे केबीन मध्ये जाऊन त्यांची भेट घेतली सदर वेळी माने मॅडम उपस्थित होत्या.सदर वेळी तक्रारदार यांनी चोपडे साहेब यांचेशी कामासंदर्भात चर्चा केली सदर वेळी माझी भाऊ असे सांगुन ओळख करुन दिली त्यानंतर तक्रारदार हे माने मॅडम ना भेटायला सांगितले होत असे चोपडे साहेब यांना बोलले असता, माने मॅडम कडन आल असल तर देणारचय की मी तुम्हाला तुमच्यासाठी लय फोन आलेत तुमचे वकिल कोणयत? तुमच प्रोसेस मध्ये आहे माझ्या समोर आल की,ऑनलाईन मध्ये येतय असे बोलले. त्यानंतर तक्रारदार हे त्यांना म्हणाले की,त्या दिवशी भेटायला मी आलो तुम्ही म्हणाला माने मॅडमला जाऊन भेटा या कामा संदर्भात, त्यावर चोपडे साहेब बोलले की, बोला आमची ऑफीसचीच माणसयत , भेटा म्हणजे फक्त काही प्रॉब्लेम आहे का बघा एवढाच विषय. असे म्हणुन त्यांनी तक्रारदार यांना बसा असे म्हणाले त्यानंतर मी व तक्रारदार बाहेर जाऊन वाट पाहत बसलो त्यानंतर थोडया वेळाने माने मॅडम यांनी तक्रारदार यांना हाक मारली व घेऊन या की, असे म्हणाले असता त्यावर तक्रारदार यांनी पैसे घेऊन येऊ असे विचारले असता माने मॅडम यांनी , "हा घेऊन या लगेच मी विचारलय साहेबांना करतो म्हणलेत असे सांगितले.यावर तक्रारदार हे माने मॅडम यांना म्हणले की, "तिकडच दयायच का साहेबांना असे विचारले असता नाय नाय माझ्याकडच दयायच करतो म्हणलेत डायरेक्ट घेणार नायत साहेब असे बोलले.त्यावर तक्रारदार यांनी तुमच्याजवळ? असा प्रश्न विचारला असता लखोटयात घालुन आणा सही करतो म्हणालेत. यावर तक्रारदार "ते म्हणले करतो सही आता पैसे घेऊन येऊ असे बोलले त्यानंतर मी व तक्रारदार आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो.अशी हकिकत पंच क्र.01 यांनी सांगितली.त्यानंतर तक्रारदार यांना गेले पासुन येई पर्यंत काय झाले याबाबत विचारणा करता तक्रारदार यांनी पंच क्र.01 यांनी सांगितले नुसार वरीलप्रमाणे हकिकत सांगितले. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरी असलेबाबतची खात्री केली.त्यानंतर पुढील कारवाई बाबत तक्रारदार यांना विचारले असता त्यांनी सांगितले की,माने मॅडम यांनी मागणी केलेली लाच रक्कम देते वेळी मी चोपडे साहेब यांची भेट घेऊन लाच रकमे संबंधी बोलणी करुन घेतो.

एकंदरीत तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीप्रमाणे क्लर्क माने मॅडम व त्यांचे वरीष्ठ चोपडे साहेब यांचेकडे दि. 27/10/2025 रोजी तक्रारदार यांना पडताळणी कामी पाठवले असता सदर पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांच्या 24 वर्षाचा सेवा कालावधी पुर्ण असलेला निवड श्रेणीचा प्रस्ताव त्यांचे शाळेने शिक्षण अधिकारी ,

माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सातारा यांचेकडे दाखल केला असुन सदर प्रस्तावाच्या मंजुरी आदेशाची मागणी संदर्भात तक्रारदार हे क्लर्क श्रीमती माने यांना भेटले असता त्यांनी सदर आदेशाचे काम पुर्ण करण्यासाठी साहेबांना 25,000/- रुपये दयावे लागतील असे सांगुन क्लर्क माने मॅडम माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांनी 25,000/- रुपयाची लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार संजय पुजारी यांना सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरू करण्यात येत असल्याबाबत सांगितले.त्यानंतर आमचे सुचनेनुसार तक्रारदार पुजारी यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी लाच रक्कम 25,000/- रुपये हजर केले.त्यानंतर मपोशि माकर यांनी नमुद नोटांचे नंबर पंच क्र.02 शेंडगे यांचे मदतीने कागदावर लिहुन काढले.

त्यानंतर तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले.त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना पडताळणी व सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची "अंगझडती व लाचेची रक्कम" जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण नवीन सिलबंद मेमरी कार्ड मोबाईल मध्ये टाकुन करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार पुजारी त्यानंतर पंच क्र.01 श्री. शेमनेवाडीकर व पंच क्र.02 शेंडगे यांचे सापळा निवेदन ध्वनीमुद्रीत केले ती वेळ 18.57 वा ची होती.

त्यानंतर आम्ही शासकिय वाहनामध्ये काळया पडदयाच्या सहाय्याने कृत्रीम अंधारात दोन्ही पंचांना व तक्रारदार पुजारी यांना अन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्याचे प्रात्यक्षिक पोहवा/4153 दिवेकर यांनी करून दाखवले.त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेले लाचेकामी वापरण्याची रक्कम व पांढरा लिफाफा पोहवा/4153 दिवेकर चालक यांना ॲन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिल्या असता, पोहवा/4153 दिवेकर चालक यांनी कापसाच्या बोळयाने प्रत्येक चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस तसेच लिफाफयास आतुन बाहेरुन ॲन्थ्रासीन पावडर लावली व त्यानंतर पोहवा/4153 दिवेकर चालक यांनी सदर लाचेची रक्कम रुपये 25000/- असलेला पांढरा लिफाफा तक्रारदार पुजारी यांच्या नेसणीस असलेल्या काळया रंगाच्या पॅन्टच्या पुढील उजव्या खिशात ठेवला.त्यानंतर आम्ही पंचांना तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या.

त्यानंतर क्लर्क माने मॅडम यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार ,दोन्ही पंच ,सापळा पथक असे श्री.उत्तर चिदंबरम नटराज मंदीर सातारा येथुन शासकिय वाहनातुन रवाना होऊन शिक्षणाधिकारी ,माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सातारा च्या काही अंतरावर शासकिय वाहन थांबवले.त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टच्या आत लाऊन देऊन तक्रारदार यांना पंच क्र.01 शमनेवाडीकर यांचे सह 19.23 वा.चे सुमारास पायी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ पंच क्र.02 व सापळा पथक चालत तक्रारदार यांचे पाठोपाठ निघालो व शिक्षणाधिकारी ,माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सातारा आवारात सापळा पथक कोणासही संशय येणार नाही अशा रितीने परिसरात थांबून होतो.तक्रारदार व पंच क्र.01 हे लोकसेवक यांचे कार्यालयात गेले थोडया वेळाने तक्रारदार व पंच हे कार्यालयातुन बाहेर आल्यानंतर लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा न करता नियोजित ठिकाणी परत गेले. त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंच व सापळा पथक शासकिय वाहनात बसले त्यानंतर पोशि महामुलकर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 19.35 वा ची होती.त्यानंतर आम्ही पंच क्र.01 यांना गेले पासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा करता पंच क्र.01 यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे शिक्षणाधिकारी ,माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सातारा येथे ऑफीस मध्ये गेलो असता सदर ऑफीस बंद होते व सदर ठिकाणी कोणीही नव्हते.त्यामुळे लाच रक्कम न देता तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा न करता परत आलो.त्यानंतर तक्रारदार यांना गेले पासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा करता त्यांनी पंच क्र.01 यांचेप्रमाणे वरीलप्रमाणे हकिकत सांगितली.त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले की,आता कार्यालयीन वेळ संपली असुन लोकसेवक यांची भेट होण्याची शक्यता नाही व त्यांना फोन करणे उचित नाही.तरी दि.28.10.2025 रोजी पुढील कारवाई करु दि.27/10/2025 रोजीची सापळा कारवाई स्थगित करण्यात यावी असे सांगितले. तक्रारदार यांनी विनंती केलेनुसार दि.27/10/2025 रोजीची सापळा कारवाई स्थगित करण्यात आली. सदरबाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

त्यानंतर दि.28/10/2025 रोजी आम्ही,पंच व सापळा पथक आवश्यक साहीत्यासह शासकिय वाहनातुन लाप्रवि पुणे येथुन रवाना होऊन तक्रारदार यांनी सांगितलेप्रमाणे श्री.उत्तर चिदंबरंम नटराज मंदीर ,सातारा येथे पोहोचलो.तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार यांना पंच क्र.01 शमनेवाडीकर यांचे सह सापळा

कारवाई कामी पाठवण्याचे ठरले.

त्यानंतर तात्काळ सापळा कारवाई चे आयोजन करुन तक्रारदार श्री.पुजारी व पंच क्र.1 श्री.शमनेवाडीकर व पंच क्र.02 श्री.शेंडगे यांचे सापळा निवेदन घेतली ती वेळ 12.40 वा ची होती. त्यानंतर आम्ही शासकिय वाहनामध्ये दोन्ही पंचांना व तक्रारदार पुजारी यांना पुन्हा एकदा अन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्याचे प्रात्यक्षिक पोहवा दिवेकर यांनी करून दाखवले.त्यानंतर तक्रारदार यांनी दि.27.10.2025 रोजी हजर केलेले लाचेकामी वापरावयाची रक्कम रूपये 25,000/- (रूपये 500/- दराच्या 50 चलनी नोटा) च्या नोटांचे क्रमांक यापुर्वीच पंचासमक्ष नमुद केलेल्या नोटांच्या क्रमांकाशी बरोबर असल्याची खात्री केली. त्यांनतर पुन्हा एकदा सदर नोटा व पांढऱ्या रंगाचा लिफाफा पोहवा/4353 चालक दिवेकर यांना अॅन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिल्या असता,पोहवा दिवेकर यांनी कापसाच्या बोळयाने प्रत्येक चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस व पांढऱ्या रंगाच्या लिफाफयास आतील व बाहेरील बाजुस अॅन्थ्रासीन पावडर लावली व त्यांनतर पोहवा दिवेकर यांनी सदर लाचेची रक्कम 25000/- रुपये असलेला पांढऱ्या रंगाचा लिफाफा तक्रारदार पुजारी यांच्या नेसणीस असलेल्या काळ्या रंगाच्या फुल पॅन्टच्या पुढील उजव्या खिशात ठेवली. त्यांनतर आम्ही पंच, तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या सूचना दिल्या.

त्यानंतर क्लर्क माने मॅडम यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता आम्ही व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टच्या आत लाऊन देऊन तक्रारदार यांना पंच क्र.01 शेमनीवाडीकर यांचेसह श्री.उत्तर चिदंबरम नटराज मंदीर सातारा येथुन रिक्षाने ,माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सातारा येथे 12.53 वा रवाना केले व त्यांचे पाठोपाठ,पंच क्र.02 ,सापळा पथक असे शासकिय वाहनातुन रवाना होऊन शिक्षणाधिकारी ,माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सातारा आवारात सापळा पथक कोणासही संशय येणार नाही अशा रितीने परिसरात थांबून होतो.तक्रारदार व पंच क्र.01 हे लोकसेवक यांचे कार्यालयात गेले थोडया वेळाने तक्रारदार व पंच हे कार्यालयातुन बाहेर आल्यानंतर लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा न करता नियोजित ठिकाणी परत गेले. त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंच व सापळा पथक शासकिय वाहनात बसले त्यानंतर पोशि महामुलकर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 13.40 वा ची होती.त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना गेले पासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले की, मी व पंच क्र.01 असे शिक्षणाधिकारी ,माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सातारा येथे शिक्षणाधिकारी चोपडे साहेब यांची भेट घेऊन लाच रकमे संबंधी बोलणी करण्यासाठी चोपडे साहेब बसत असलेल्या ऑफीस मध्ये गेलो असता चोपडे साहेब यांची भेट झाली सदर भेटी दरम्यान मी चोपडे साहेब यांना माने मॅडम यांनी मला माझे कामासाठी रुपये 25000/- मागितले असुन सदर रक्कम मी आपणाकडे देऊ का माने मॅडम यांचेकडे देऊ असे विचारले असता चोपडे साहेब मला बोलले की,पैसे देण्याची गरज नाही आमच्या ऑफीसमध्ये कोणी पैसे मागत नाही तुमचा आदेश तयार आहे घेऊन जावा असे म्हणुन मला माझा 24 वर्षाचा सेवा कालावधी पुर्ण असलेला निवड श्रेणीचा प्रस्ताव मंजुरी चा आदेश दिला.त्यानंतर मी माझा आदेश घेऊन माने मॅडम यांचे कार्यालयात गेलो असता माने मॅडम तिथे दिसल्या नाहीत त्यामुळे मी लाच रक्कम न देता व लाच रक्कम स्विकारलेबाबत चा पुर्व नियोजित इशारा न करता परत आलो. त्यानंतर पंच क्र.01 यांना गेले पासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा करता त्यांनी तक्रारदार यांचे वरीलप्रमाणे हकिकत सांगितली.

त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

त्यानंतर तक्रारदार यांना माने मॅडम यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांना देणेबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की,माने मॅडम या आत्ता या जेवण करण्यासाठी गेल्या असाव्यात त्या तीन वा चे सुमारास येतील त्यावेळी मी माने मॅडम यांची भेट घेऊन लाच रक्कम देतो.त्यानंतर क्लर्क माने मॅडम यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता सापळा कारवाईचे आयोजन करुन आम्ही व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टच्या आत लाऊन देऊन तक्रारदार यांना पंच क्र.01 शेमनीवाडीकर यांचेसह श्री.उत्तर चिदंबरम नटराज मंदीर सातारा येथुन रिक्षाने ,माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सातारा येथे 15.17 वा रवाना केले व त्यांचे पाठोपाठ,पंच क्र.02 ,सापळा पथक असे शासकिय वाहनातुन रवाना होऊन शिक्षणाधिकारी ,माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सातारा आवारात सापळा पथक कोणासही संशय येणार नाही अशा रितीने परिसरात थांबून होतो.तक्रारदार व पंच क्र.01 हे लोकसेवक यांचे कार्यालयात गेले थोडया वेळाने तक्रारदार व पंच हे कार्यालयातुन बाहेर आल्यानंतर लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा केला असता आम्ही व सापळा पथक माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सातारा कार्यालयात येऊन पोशि महामुलकर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 15.51 वा ची होती. त्यानंतर यापुर्वी सुचना दिलेप्रमाणे मपोहवा गोरे यांनी

व्हिडीओ चित्रीकरण सुरु केले.त्यानंतर क्लार्क माने मॅडम यांना मपोशि माकर यांनी दोन्ही हात घट्ट पकडुन पंचासमक्ष ताब्यात घेतले. त्यांनतर तक्रारदार यांना क्लार्क माने मॅडम यांनी लाच रक्कम कुठे ठेवली याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की, मी क्लार्क माने मॅडम यांना तुम्ही सांगितले प्रमाणे 25,000/- हजार रुपये आणलेआहेत असे बोलुन माझे नेसत्या पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशामध्ये ठेवलेल्या लाच रकमेचा लिफाफा उजव्या हाताने काढुन क्लर्क माने मॅडम यांचे पुढे धरला असता क्लर्क माने मॅडम यांनी ठेवा तिथ असे म्हणुन मला लाच रक्कम त्यांचेकडील फाईल मध्ये ठेवण्यास सांगितलेने मी सदर 25000/- रुपये लाच रक्कम असलेला लिफाफा फाईल मध्ये ठेवला वत्यानंतर त्यांनी तो लिफाफा हातात घेतला व परत फाईल मध्ये ठेवला आहे.त्यानंतर क्लर्क माने मॅडम यांना पंचासमक्ष लाच रकमेबाबत विचारले असता त्यांनी त्यांचेकडील फाईल मध्ये लाच रक्कम असलेला लिफाफा असलेबाबत सांगितले व सदर फाईल काढुन दिली.त्यानंतर आम्ही पंच क्र.02 श्री.शेंडगे यांनी क्लर्क माने मॅडम यांनी काढुन दिलेल्या फाईल मध्ये असलेल्या पांढरा लिफाफा उघडुन लाच रकमेतील नोटांचे नंबर आणि पंच क्र.02 श्री.शेंडगे यांचे जवळील सापळा पुर्व कारवाई दरम्यानचे नोटांचे नंबर लिहुन दिलेल्या कागदावरील नंबर हे एकच आहेत का याबाबत खात्री करण्यास सांगितले.त्याप्रमाणे पंच क्र.02 श्री.शेंडगे यांनी नोटांचे नंबर त्यांचेकडील कागदावर लिहीलेल्या नंबरशी पडताळुन पाहीले असता ते तंतोतंत जुळुन आले. त्यानंतर क्लर्क माने मॅडम यांचे ऑफीसमध्ये लाईट बंद करुन कृत्रीम अंधारामध्ये क्लर्क माने मॅडम ÷ यांचेकडुन हस्तगत केलेली लाच रक्कम व पांढरा लिफाफा त्यांचे दोन्ही हात अल्ट्रा व्हायलेट दिव्याच्या प्रकाशामध्ये दोन्ही पंचासमक्ष तपासणी केली असता क्लर्क माने मॅडम यांचे दोन्ही हातास पुढील बाजुस ,बोटांच्या पेऱ्यावर निळसर चकाकी दिसुन आली.तसेच हस्तगत केलेल्या लाच रक्कम 25000/- रुपये सदर रक्कम ठेवलेला लिफाफा यावर अन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली.तसेच सदर लाच रक्कम असलेला पांढरा लिफाफा ठेवलेली फाईल ची आतील बाजु व फाईल मधील कागदावरही ॲन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली.तसेच पंच क्र.02 यांचे हातासही ॲन्थ्रासीन पावडरची निळस र चकाकी दिसुन आली. सदर वेळी नमद आरोपी लोकसेवक माने यांचे ताब्यातुन तक्रारदाराचे त्यांचेकडे प्रलंबित असलेले कामाचे उर्वरीत कागदपत्रे असलेली फाईल हस्तगत करण्यात आलेली आहे.सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी दि.27.10.2025 रोजी तक्रारदार श्री.संजय बापुराव पुजारी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. 27.10.2025 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार श्री.संजय बापुराव पुजारी,वय- 62 वर्षे ,धंदा -सेवानिवृत्त रा.कृष्णा कोयना सोसायटी प्लॉट नं.3ए सौभाग्य मंगल कार्यालयाजवळ,गोलेश्वर रोड कार्वे नाका कराड जि.सातारा.यांच्या 24 वर्षाचा सेवा कालावधी पुर्ण असलेला निवड श्रेणीचा प्रस्ताव त्यांचे शाळेने शिक्षण अधिकारी ,माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सातारा यांचेकडे दाखल केला असुन सदर प्रस्तावाच्या मंजुरी आदेशाची मागणी संदर्भात तक्रारदार हे क्लर्क श्रीमती माने यांना भेटले असता त्यांनी सदर आदेशाचे काम पुर्ण करण्यासाठी साहेबांना 25,000/- रुपये दयावे लागतील असे सांगुन क्लर्क माने मॅडम माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद ,सातारा यांनी 25,000/- रुपयाची पंचासमक्ष लाच मागणी करुन पंचासमक्ष 25,000/- रुपये लाच रक्कम तक्रारदार संजय बापुराव पुजारी यांचेकडुन स्विकारली म्हणुन माझी श्रीमती वैशाली शंकर माने वय-40 वर्षे व्यवसाय –नोकरी पद वरीष्ठ सहायक ,माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सातारा यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7,7अ प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Rajendra Bapu Maske(I (Inspector)) /

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खब्रर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Rajendra Bapu Mask
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पो.स्टे.ऑफिसर
सातारा शहर पोलीस ठाणे

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**